Vol. 1, Issue . 1 / February 2011, pp.145-147

Research Paper - History

ISRJ

# स्त्रीवादी इतिहास

**प्रा. जयदीप वसंतराव साठे**
कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा.
जि. सोलापूर

साक्षरता, एकता, अस्मिता, नम्रता काळाची गरज आहे. महिलांच्या विकासासाठी त्यांच्यातील महिला जाग्या करण्यासाठी व स्वावलंबी जीवनासाठी शिक्षणाची गरज आहे. शिक्षण म्हणजे विकासाचे मुळे, अंधारातून प्रकाशाकडे जाणे होय. शिक्षणामुळे माणसात आत्मविश्वास निर्माण होवुन ते निर्भय होते. स्त्रीया निर्भय बनून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी महिलांनी साक्षरतेसाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. एक स्त्री शिकली तर सर्व कुटुंब साक्षर होते हे आता नविन सांगायला नको. १९९१ च्या शिरगणतीनुसार स्त्रीयांचे साक्षरतेचे प्रमाण ५०:५१ असे होते. याचाच अर्थ असा की, एकूण स्तीयांपैकी अर्ध्या स्त्रीया निरक्षर आहेत.[१] साक्षरतेचे प्रमाण शहरी भागात जास्त आहे. स्त्रीयांचे शिक्षण न घेण्याला अनेक गोष्टी कारणभूत आहेत. घरगुती अडचणी, समज, गैरसमज, सामाजिक बंधने, रुढी परंपरा, सामाजिक असुरक्षितता, शैक्षणिक वातावरणाचा अभाव, शैक्षणिक सुविधांचा अभाव इत्यादी अडचणी स्त्रीयांच्या शिक्षणात आहेत.

आपल्या देशात प्राचीन कालखंडापासून आजतागायत काही स्तीया शिक्षण घेऊन अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती केलेली आहे. स्त्री शिक्षणाच्या दिशा याबद्दल मी माझ्या निबंधामध्ये उहापोह केलेला आहे.

समजात स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जाते. तसेच मोठ-मोठ्या राजघराण्यातील स्त्रीयांनाच शिक्षण दिले जात असे. आधुनिक सहजीवनासाठी स्त्री-पुरुष दोघांचे महत्व सारखेच आहे. पण मग शिक्षणाच्या बाबतीतच स्त्रीया मागे का राहिल्या होत्या? स्त्रीला तिचा पती मरण पावल्या सती जावे लागत होते. अंधाऱ्या कोठडीत डांबून ठेवले जात. मध्ययुगीन कालखंडात तर स्त्री जन्म मोठे पाप वाटू लागले होते. अशातच एक स्ती जन्माला पुर्नजन्म देणारे राजाराम मोहन रॉय एक क्रांतीची नवी ज्योत घेवून पुढे आले. त्यांनी प्रथम बालविवाह प्रथेला बंदी घातली, सती प्रथेला शिक्षणाची कवाडे उघडी केली पाहिजेत हे रॉयचे मत होते. या विचारातून स्त्री शिक्षणाची पहाट फुलली. म्हणून त्यांना भारताचे आद्य प्रबोधनकार मानले होते.

फुलेकालीन स्त्री जीवन अत्यंत असाह्य बनलेहोते. स्त्री परावलंबी , अबला, पुरुष सुखाचेएक साधन मानलेजात होते. महात्मा फुलेंनी शिक्षणातून स्त्री जीवन समृध्द करण्यासाठी टाहोफोडला. १९ व्या शतकात हिंदू मुलींसाठी पहिली शाळा कलकत्ता येथेसन १८२९ साली अमेरिकन मशिननेसुरु केले. स्वतंत्रपणेमुलींची शाळा काढणारेमहात्मा फुलेहे पहिलेभारतीय होते. त्यांनी सन १८४८ मध्येपुण्यात बुधवार पेठेत भिड्यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा सुरु केली[२]. स्त्री शिक्षणाची अद्य जनकत्वाचा मान प्रथम ज्योतीबा फुल्यांनाच मिळाला.ज्योतीबा फुल्यांचेलग्न सावित्रीबाईशी झाले. नंतर त्यांनी शिक्षणाचा प्रसार व प्रचार आपल्या पत्नीपासून केला [३]. कारण एक स्त्री जरी शिकली तर पूर्ण कुटूंबाचा विकास होतो. म्हणून ज्योतीबा फुलेव सावित्रीबाई फुलेही भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील दोन क्रांती फुलेच ठरली.

आपल्या भावी पिढीच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी स्त्री वर्गावर असल्यानेआपण स्त्रीयांना शिक्षण जरुर दिलेच पाहिजे. ''जीच्या हाती पाळण्याची दोरी ती जग उध्दारी '' यावरुन स्त्रीचेमहत्व स्पष्ट होते. स्त्रीया जर अशाच पध्दतीनेपुढेशिकत राहिल्या तर देशाचाही विकास

झाल्याखेरीज राहणार नाही. शिकलेल्यांचेअक्षर पुसता येत नाही. म्हणुनच स्त्री शिक्षणाची गरज पूर्ण होणेमहत्वाचेआहे.

आपल्या सुजलाम् सुफलाम् या भारत देशात स्त्री शिक्षणाबद्दल आग्रह धरणारेथोर समाजसेवक सुधारक होवून गेले. तेम्हणजेज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, पं.रमाबाई , स्वामी विवेकानंद, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर , डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् , विनोबा भावे, महात्मा गांधी, महर्षी धोंडोकेशव कर्वेइ . शिक्षण सुधारकांनी शिक्षणाला धार्मिक शिक्षणाची जोड दिली. ज्योतीबा व सावित्री फुलेआजही प्रेरणादायी वाटतात. महात्मा गांधी म्हणतात की, स्त्री ही पुरुष जीवनाची जडण घडण करणारी माता ही आहे व नेता ही आहे.

पं. रमाबाईंनी मुंबई येथेशारदा सदन ची स्थापना करुन स्त्री शिक्षण कार्यातील एक पुढचेपाऊल उचललेहेसदन बालविधवांच्या साठी सुरु केलेहोते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शुद्रादीकांना शिक्षणाचा पाठ दिला. या थोर सुधारकांनी आपल्या भारतात स्त्री शिक्षण देण्यास सुरुवात केल्यामुळेतर आजच्या स्त्रीया शिक्षण घेत असताना दिसतात. या सर्व समाजसुधाकरांनी स्त्रीयांच्या पायातील बेड्या तोडून त्यांना शिक्षणाचचे महत्व पटवून दिले[४]. आज समता युगाचा प्रारंभ झाल्यामुळेच होऊ शकला. या थोर समाज सुधारक व स्त्री शिक्षण सुधारकांचेऋण शब्दांत मांडता येणर नाहीत. असेच त्यांचेकार्य आहे. या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाचा पाया रोवून स्त्री जीवनाला नवी दिशा दिलेली आहे.

स्त्री शिक्षणाबद्दलचेऐतिहासीक कारकिर्दीत थोर सुधारकरांनी शिक्षणाची एक ज्योत प्रकाशमान केल्यामुळेआज आपणाला स्त्री सर्व क्षेत्रात उतरलेल्या दिसतात. ही गौरवास्पद गोष्ट आहे.

आज भारतातील स्त्रीया विविध क्षेत्रात आहेत. भारतीय खेळाडू महिलांनी भारत देशाचेनांव उंचावर नेवून ठेवलेआहे. भारतीय पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला तर शिखरावर जावून पोहोचली. तर क्रीडा क्षेत्रात सायना नेहवाल, सानिया मिर्झा, अंजू जॉर्ज, यांनी नाव रोशन केलेआहे. हेसर्व महात्मा फुलेव सावित्रीबाई फुलेयांच्यामुळेच शक्य होत आहे. नाहीतर आजही आपण चूल आणि मुल या जीवन पध्दतीत वाढलोअसतो. आज आपल्या देशातील, महाराष्ट्रातील , जिल्ह्यातील , तालुक्यातील महाविद्यालयातील शाळेत महिला शिक्षक, प्राध्यापिका आहेत. त्या प्रत्येक महिला प्राध्यापिकांमध्येआज सावित्रीबाई फुले, पंडीता रमाबाई यांचेदर्श न आजही होत आहे. एवढेच काय पण भारतातील स्त्रीया या शास्त्रज्ञ आहेत. आज महिलांची भरारी गिर्यारोहन तेसंगणक क्षेत्रापर्यंत गेली आहे. महाविद्यालयात महिला या कला, विज्ञान, वाणिज्या, व्यवसायिक क्षेत्रात स्पर्धा करत आहेत. ही विज्ञानाची गंगोत्री अशाच प्रकारेसर्व महिलांना विविध क्षेत्रात घेवुन जात आहे.

अशा रितीनेसर्वच क्षेत्रात महिलांना स्थान प्राप्त झाल्यानेभारतात प्रत्येक कुटूंब सुसंस्कारीत होण्यास मदत झालेली आहे. आपला इतिहास हा ज्या गोष्टींवर अवलंबून आहे. अशा लष्करी दलातही महिलांचा समावेश आहे. स्त्री शिक्षण हेफुलेंच्या काळापासून आज पर्यंत वाऱ्याच्या वेगाप्रमाणेधावत आहे.

स्त्री शिक्षण हेगरजेचेआहे. कारण कोणत्याही कुटूंबातील एक पुरुष शिकला तर तोकेवळ स्वत: करीताच शिकला असेआहे. परंतू कुटूंबातील स्त्री शिकली तर सर्व कुटूंबच शिकल्यासारखेआहे. स्त्रीयांनी शिक्षण घेतले तर एकच आदर्श स्त्री, आदर्श माता, आदर्श शिक्षिका बनण्यास वेळ लागणार नाही. आज एच.आय.व्ही या भयानक रेगाला बळी पडण्यात युवक वर्गाचा समावेश जास्त आहे. यासाठी महाविद्यालयात याबाबत आरोग्य शिक्षण व लैगिक प्रशिक्षण उद्याच्या भारतसाठी

देणेगरजेचेआहे. याचेज्ञान स्त्रीयांना असणेआवश्यक आहे. कारण उद्याच्या भारतातील स्त्री ही शिक्षणातील दिपस्तंभ म्हणून ओळखली जाईल. आपला व्यक्तिमत्व विकास घडवून आणून या देशात स्त्री शिक्षणाचा ध्वज उंच उंच उभारला पाहिजे. तरच आपल्या गावाचा, देशाचा , विकास होणार आहे.

प्राणापेक्षा ज्याला आपण पोर म्हणतोत्यास जपणेहेअवघड काम स्त्रीच करु शकणार आहेतेव्हा ज्या स्त्रीवर आपत्य संगोपनाचेएवढेजबाबदारीचेकाम आपण सोपवितो. तर मग तिला अक्षर शत्रू असू देवू नये. स्त्री शक्ती जागी केल्याशिवाय स्त्रीमुक्ती होणार नाही. मुलींना फुलायचेआहे, माणूस म्हणून जगायचेआहेयासाठी आज स्त्रीयांना शिक्षण घेणेगरजेचेआहे. मानवजातीच्या एकात्मतेसाठी स्त्रीशिक्षण हवेआहे. आईच्या मांडीवर बालक पहिला पाठ घेत असते. म्हणुन स्त्रीयांना शिक्षण घेणेमहत्वाचेआहे. त्यातच मुख्य म्हणजेआपल्या भारतातील अफाट वाढत असणाऱ्या लोकसंख्येमुळेस्त्रीशिक्षणाची गरज आहे.

मुलगी म्हटली की, बालपणात पिता, वैवाहिक जीवनात पती, व वृध्दावस्तेत पुत्र यांच्या आधाराशिवाय जीवन जगण्यासाठी स्त्रीया शिकल्या पाहिजेत. सुगृहीणासाठी तर तिला स्वतंत्र शिक्षणाची गरज आहे. स्त्रीयांना सामाजिक दर्जा जोपासण्यासाठी व त्यातून समाज विकास साधण्यासाठी त्यांना सर्व प्रकारचेशिक्षण, प्रशिक्षण मिळणेआवश्यक आहे. आजचा समाज अनेक अनिष्ठ गोष्टींनी गुंतागुंतीचा होऊन गेलेला आहे. सत्ता व मालमत्ता याविषयी वाटणाऱ्या मोहामुळेअनेक प्रकारचेदु:ख वाढलेआहे. सामाजिक स्थित ी अविश्वासाची , अन्यायाची होऊन बसल्यानेसर्वत्र एक प्रकारची अगतिकता दिसुन येत आहे. अशावेळी सुशिक्षित, सुसंस्कृत , सदाचारी स्त्री, सर्व समाजाची नेतृत्व करेल तेव्हा उद्याच्या उज्वल व सुखी, संपन्न भारताचेस्वप्न साकार होईल असा विश्वास वाटतो.

आज बदलत्या परिस्थितीमध्येस्त्रीयांची संख्या पुरुषांपेक्षा कमी होत आहे. त्यामुळेस्त्रीयांनी शिक्षणाचेमहत्व ओळखून पुरुषांपेक्षा कर्तबगारीची क्षितीजेरुंदावली पाहिजेत. आपल्या भविष्यकाळात स्त्री शिक्षणाचेउद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण झाल्यास उद्याच्या भारताचेराजकिय नेतृत्व स्त्रीयांकडेआल्यास देश जागतिक सत्ताधीश राष्ट्र बनू शकेल.

## संदर्भ


- लोकराज्य ,
  मार्च १९९३, पृष्ठ क्रमांक ८
- लिला पाटील,
  मुलींचेशिक्षण, पृष्ठ क्रमाकं १३,१५
  तत्रैव.
- प्रा. रा.तु. भगत,
  स्त्री शिक्षणांचेशिल्पकार,
  पृष्ठ क्र. १,२,२२,२३,२७
  तत्रैव.
- प्रा. डॉ. शकुंतला लाटकर, चंद्रकुमार डांगे,
  प्रा.रा.तु.भगत,
  नवभारत शिक्षण व शिक्षक,
  पृष्ठ क्रमांक ४४,६९.